माइक्रोस्कोप

(सूक्ष्मदर्शक)

मैक्सीन कुमिन, चित्रे: अर्नोल्ड लोबेल

मराठी अनुवाद - मानसी महाजन



एंटोन ल्यूवेनहोक डच होते. ते कापड आणि शिवणकामाचे साहित्य विकत असत.

त्यांचे दुकान उघडायची वाट बघून, आतील धूळ खात पडलेला माल पाहून गिऱ्हाईके वैतागत असत.

दुकानाकडे लक्ष द्यायचे सोडून ते विशिष्ट प्रकारचे भिंग तासण्यात मग्न असत.

ते मायक्रोस्कोप तयार करत होते!


लेखक आणि चित्रकार यांनी त्यांच्या काहीशा विनोदी शैलीत लहान वाचकांसाठी 17 व्या शतकातले ल्यूवेनहोकचे जग उभे केले आहे. त्याबरोबरच त्यांच्या मायक्रोस्कोपने दाखवलेले सूक्ष्म, आश्चर्यकारक आणि कधी न पाहिलेले जगही समोर आणले आहे.


माइक्रोस्कोप

(सूक्ष्मदर्शी)


मैक्सीन कुमिन, चित्रे: अर्नोल्ड लोबेल

मराठी अनुवाद - मानसी महाजन




DELFT


एंटोन ल्यूवेनहोक डच होते.
ते कापड आणि
शिवणकामाचे साहित्य
विकत असत.









त्यांचे दुकान उघडायची वाट
बघून, आतील धूळ खात
पडलेला माल पाहून
गिऱ्हाईके वैतागून निघून
जात.



एंटोन खूप काम करत असत.
मात्र दुकानाकडे लक्ष द्यायचे सोडून



ते दिवसभर विशिष्ट प्रकारचे
भिंग तासण्यात मग्न असत.




ते मायक्रोस्कोप तयार
करत होते!




मायक्रोस्कोप वापरुन
त्यांनी पाहिलेल्या गोष्टी:

डासाचे पंख,






मेंढीचे केस,




उवांचे पाय,



माणसांची,




कुत्र्यांची,




आणि उंदरांची कातडी,




बैलाचा डोळा,



कोळयाचे जाळे
विणायचे दात,




माशाचे खवले,



स्वतःच्या रक्ताचा थेंब,

आणि सर्वात आश्चर्यकारक म्हणावे तर पाण्याच्या एका थेंबात पोहणारे, उड्या मारणारे, एकमेकांना ढुशा देणारे अतिसूक्ष्म अज्ञात असे किडे.






“केवळ अशक्य!” लोक म्हणत.

“एंटोनचं डोकं फिरलंय!

त्याने म्हणे माशीचा मेंदू
पहिला आहे.

त्याला देशातून हकलूनच
द्यायला हवा!”


स्पेन की ओर
TO SPAIN

“आपण पितो त्या पाण्यात किडे असतात म्हणे!

वेड लागलंय त्याला!”


लोक त्यांना ‘डमकॉप’, म्हणजे ‘मूर्ख’ म्हणत.








आणि अशा प्रकारे आपल्याला मायक्रोस्कोप मिळाला.





ऐतिहासिक नोंद

एंटोन वैन ल्यूवेनहोक यांनी मायक्रोस्कोप (सूक्ष्मदर्शक यंत्र) तयार केला नसला माणसाने पूर्वी कधीही न पाहिलेल्या गोष्टी त्यांनी मायक्रोस्कोपच्या मदतीने पहिल्या. फक्त मेंढीचे केस आणि उवांचे पायच बघितले नाहीत, तर प्रोटोझोआ (ज्याचे नामकरण त्यांनी ॲनिमलक्युल्स असे केले) आणि बॅक्टीरिया (लोकांच्या आजारपणाचे हे कारण असते हे मात्र त्यांना समजले नव्हते) शोधून काढले. ल्यूवेनहोकच्या काळात नेदरलँड मध्ये अनेक चांगल्या गोष्टी घडत होत्या. डच व्यापारी जगभरात व्यापार करत होते, रेंब्राँ आणि वरमीर सारखे चित्रकार त्या देशात होते. ल्यूवेनहोक यांनी स्वतःच्या हाताने भिंगे तासून तब्बल 247 मायक्रोस्कोप तयार केले. त्यांच्या काही देशवासियांनी त्यांना 'डमकॉप' म्हंटले असले, तरी इतरांनी त्यांची बुद्धिमत्ता जाणली, आणि त्यांची रॉयल सोसायटी ऑफ इंग्लंड मध्ये निवड झाली